# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 411 018.
# करआकारणी व करसंकलन विभाग

| | |
|---|---|
| परिपत्रक स्वरुप | सामान्य करात सूट देणेबाबत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/5/कावि/ 42 /2017, दिनांक - 8 / 3 /2017 |
| विषय | एक रक्कमी मिळकतकराचा भरणा ऑनलाईन पेमेंट गेट-वेद्वारे करणा-या मिळकतधारकास सामान्य करातील सवलतीबाबत |
| कोणाच्या माहितीसाठी | प्रशासन अधिकारी / सहा.मंडलाधिकारी / गट प्रमुख / रोखपाल / उपलेखापाल |
| संदर्भ | 1. मा. महापालिका सभा ठराव क्रमांक 973, दिनांक 06 जानेवारी 2017 |

परिपत्रक

मा. महापालिका सभा ठराव क्रमांक 973, दिनांक 06 जानेवारी 2017 अन्वये शहरातील नागरिकांना ऑनलाईन (डिजीटल) पेमेंट गेट-वेचा वापर करण्यास प्रवृत्त करणे, कराचा भरणा करणेसाठी वेळेचा होणारा अपव्यय टाळणे तसेच कॅशलेस ट्रांजेक्शन करण्यासाठी प्रोत्साहन देणेच्या दृष्टीने जे मिळकतधारक संपूर्ण थकबाकीसह मिळकत कर बिलाची रक्कम दिनांक 01/04/2017 ते 30/06/2017 अखेर महापालिकेच्या मोबाईल ॲप व संकेत स्थळावरील ऑनलाईन पेमेंट गेट-वेचा वापर करुन मिळकत कराचा भरणा एक रक्कमी करतील अशा मिळकतधारकास सर्वसाधारण ( चालू वर्षाचे मागणीतील सामान्य करात) करात 5% सवलत द्यावी. तसेच दिनांक 01/07/2017 ते 31/03/2018 या कालावधी वरीलप्रमाणे मिळकत कराचा भरणा करतील अशा मिळकतधारकास सर्वसाधारण ( चालू वर्षाचे मागणीतील सामान्य करात) करात 2% सवलत देणेबाबत मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने ऑनलाईन पेमेंट गेट-वेद्वारे मिळकतकराचा एक रक्कमी भरणा करणा-या मिळकतधारकास सामान्य करातील सवलत देणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

1. मिळकतधारक संपूर्ण थकबाकीसह मिळकत कर बिलाची रक्कम दिनांक 01/04/2017 ते 30/06/2017 अखेर महापालिकेच्या मोबाईल ॲप व संकेत स्थळावरील ऑनलाईन पेमेंट गेट-वेचा वापर करुन मिळकत कराचा भरणा एक रक्कमी करतील अशा मिळकतधारकास सर्वसाधारण ( चालू वर्षाचे मागणीतील सामान्य करात) करात 5% सवलत देणेत द्यावी.

2. दिनांक 01/07/2017 ते 31/03/2018 या कालावधी वरीलप्रमाणे मिळकत कराचा भरणा करतील अशा मिळकतधारकास सर्वसाधारण ( चालू वर्षाचे मागणीतील सामान्य करात) करात 2% सवलत देणेत यावी.

3. विषयांकित सवलतीसह माजी सैनिक व स्वातंत्र्य सैनिक, किंवा त्यांचे पत्नी, फक्त महिलांचे नावे असलेले मिळकतधारक, 40% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणारे मिळकतधारक यांनी सदर सवलतींचा लाभ घेणेकामी सादर केलेल्या अर्जाचे प्रकरणी सवलतीचा आदेश निर्गत केल्यानंतर त्याची मिळकत कर संगणक प्रणालीमध्ये तात्काळ नोंद घेणेत यावी. सदर सवलत देणेकामी संगणक प्रणालीमध्ये नोंद केल्यानंतर विषयांकित सवलतीचा लाभ ऑनलाईन गेटवेचा वापर करणा-या मिळकतधारकांनाच अनुज्ञेय आहे.

4. ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत अंतिम भोगवटा पत्रक व अंतिम ग्रीन बिल्डींग Certificate मिळकतधारकांनी सामान्य करातील सवलत मिळणेकामी सादर केल्यास संगणक प्रणालीमध्ये नोंद घेणेत यावी. सदर सवलतीसह विषयांकित सवलतीचा लाभ ऑनलाईन गेटवेचा वापर करणा-या मिळकतधारकांनाच अनुज्ञेय आहे.

5. दिनांक 30/06/2017 पूर्वी संपूर्ण मिळकतकराची रक्कम आगाऊ भरणा-या मिळकतधारकांनी ऑनलाईन गेटवेद्वारे भरणा केल्यास सदर मिळकतधारकांना आगाऊ भरणा केल्यास देण्यात येणा-या सवलतीसह विषयांकित सवलतीचा लाभ अनुज्ञेय आहे.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – 411018

प्रति, 1) प्रशासन अधिकारी / सहा.मंडलाधिकारी, --------------- विभागीय कार्यालय

प्रत : 1) मुख्य लेखापरिक्षण विभाग
2) लेखा विभाग
3) संगणक विभाग 4) मे. बिल क्लाऊड प्रा.लि.,पुणे

2/- उक्त नमूद केल्याप्रमाणे सामान्य करातील सवलतीचा लाभ मिळकतधारकांना देणेकामी संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करावेत.